Vol III Issue X April 2014 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-10 | April-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# भारतीय नियोजनाची साठ वर्षे -एक मूल्यांकन

आसावरी आर. दुर्गे

व्यवसाय व्यवस्थापन विभाग प्रमुख : कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, महादूला, कोराडी, नागपूर

सारांश :-

भारतात आर्थिक नियोजनाचा विचार स्वातंत्र्य आंदोलनाच्या मध्ये उत्पन्न झाला. 1938 मध्ये कॉंग्रेसने पंडित जवाहरलाल नेहरूच्या अध्यक्षतेत 'राष्ट्रीय योजना समिती' स्थापन केली. परंतु द्वितीय विश्वयुद्ध, स्वातंत्र आंदोलन प्रक्रियेत वाढ व हतर राजनैतिी हालचालीमुळे या समितीचे निवेदन 1948 ला प्राप्त झाले. परंतु स्वतंत्रता पूर्व कोणत्याही योजनाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. 1950 मध्ये भारत सरकारने देशाचा तीव्र गतीने विकास करण्याच्या उद्देशाने योजनाबद्ध विकासाचा मार्ग स्वीकारण्याचा निश्चय केला. मार्च 1950 मध्ये या कारणामुळे पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेत 'योजना आयोग' स्थापन केल्या गेले.

## प्रस्तावना :

भारतात आर्थिक विकासासाठी, विकासाच्या पंचवार्षिक योजना कार्यान्वित करण्यात आल्या. पहिली पंचवार्षिक 1 एप्रिल 1951 ला प्रारंभ झाली. अशाप्रकारे भारतात आर्थिक नियोजनाचे युग 1 एप्रिल 1951 पासून सुरु झाले. आर्थिक नियोजनाला सुरुवात होऊन आज जवळपास 60 वर्षे झाली आहेत. नियोजनाच्या या काळात विकासनशील देशांमध्ये सर्वात अधिक वेगाने विकसित होणाऱ्या दहा देशात भारताचा कमांक लागतो व काही क्षेत्रातील प्रगतीही उत्साहवर्धक आहे. या 60 वर्षात 11 पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या. 11 वी पंचवार्षिक योजना सुरु आहे. या काळातील प्रत्येक योजनेचे उद्दिष्ट्ये व यश अपयशाचे मूल्यांकन केल्यास नियोजनाचे ठळक यश अपयश पुढील प्रमाणे आहे.

## नियोजनाचे ठळक यश–

एका अल्पविकसित व परावलंबी असलेल्या अर्थव्यवस्थेचे परिवर्तन हया काळात एका आधुनिक व स्वावलंबी अर्थव्यवस्थेत झाले ही राष्ट्रीय अभिमानाची बाब आहे. कित्येक क्षेत्रात भारताचा आर्थिक विकास समाधानकारक आहे. आर्थिक विकासाचा दर वाढलेला असून त्यात विविधता आली आहे. बचत गुंतवणूक यात वाढ झाली आहे. अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनलो आहोत. शेतीच्या संरचनेत बरेच परिवर्तन घडून आले आहे. उच्च दर्जाच्या कुशल मानव शक्तीच्या प्रशिक्षणाची क्षमता वाढली आहे व काही क्षेत्रात तर आम्ही याची निर्यात पण करीत आहोत. आधुनिक अधिकोषण व्यवस्था, राजकीय व अर्थराजकीय व सहकारी संस्थांचा अभूतपूर्व विस्तार झाला आहे.

आधुनिक उत्पादन पद्धती, विपणन पद्धतीचा वापर, जन्मदर, मृत्युदर, बालमृत्युदर, सरासरी आर्युमान हयात इष्ट प्रकारचे परिवर्तन झाले आहे.

### 1} राष्ट्रीय उत्पन्नात वाढ :

राष्ट्रीय उत्पन्नात वाढ आर्थिक विकासाचे प्रतीक आहे. भारतात स्वातंत्र्यपूर्वी राष्ट्रीय उत्पन्नात 0.5 टक्के प्रतीवर्ष दराने वाढ झाली

आहे. पंचवार्षिक योजना काळात राष्ट्रीय उत्पन्नात वाढीचा दर हा 4.1 टक्के प्रतिवर्ष होता. पहिल्या पंचवार्षिक योजनेत वाढीचा दर 2.2 टक्के निर्धारित केला गेला. प्रत्यक्षात मात्र 3.7 टक्के प्रतिवर्ष वाढ झाली. दुसऱ्या योजना ते आठवी योजना पर्यंत विकास दराचे लक्ष्य 5टक्के निर्धारित केल्या गेले. काही योजनाच आपले लक्ष्य पूर्ण करू शकल्या. आठव्या योजनेत विकास दर वाढून 6.6 टक्के झाला. नववी योजनेचे लक्ष्य 6.5 टक्के ठरविल्या गेले. दहावी योजनेचे लक्ष्य 8टक्के तर अकरावी योजनेचे 8 टक्के वरून 10 टक्के करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.

प्रत्येक योजनेनुसार असणारा वृद्धीदर पुढील तालिकेत दिला आहे.

तालिका –1

पंचवार्षिक योजनांमध्ये विकास प्रगतीदर दरसाल, दर शेकडा दर

| कालखंड | लक्ष्य {उद्दिष्ट} | प्रत्यक्ष |
|---|---|---|
| 1 ली योजना {1951–56} | 2.1 | 3.61 |
| 2 री योजना {1961–66} | 4.5 | 4.1 |
| 3 री योजना {1969–66} | 5.6 | 2.5 |
| 4 थी योजना {1969–74} | 5.7 | 3.3 |
| 5 वी योजना {1974–79} | 4.4 | 5.00 |
| 6 वी योजना {1980–85} | 5.2 | 5.4 |
| 7 वी योजना {1985–90} | 5.0 | 5.8 |
| 8 वी योजना {1992–97} | 5.6 | 6.5 |
| 9 वी योजना {1997–2002} | 6.6 | 4.6 |
| 10 वी योजना {2002–2007} | 8 | – |
| 11 वी योजना {2007–2012} | 10 | – |

{वरील तालिकेत पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांमधील वृद्धी दराबाबतची उद्दिष्टे किंवा लक्ष्ये ही राष्ट्रीय उत्पन्नाच्या रूपात निर्धारित करण्यात आली होती. 4 थ्या योजनेत ही उद्दिष्टे शुद्ध देशीय उत्पादनाच्या रूपात होती. हयानंतरच्या सर्वच योजनांमध्ये सकल देशी उत्पादनाचा वापर केला आहे.}

वरील तालिकेवरून स्पश्ट होते की पाचव्या योजनेपावेतो विकास {वृद्धी} दर हा 2.8 ते 4.8 टक्कयाच्या दरम्यान कमी जास्त होत होता. 6व्या योजनेनंतर मात्र वृद्धी दरात सतत वाढ होत होती. हा दर वाढत जाऊन 8 व्या योजनेत 6.5 टक्के झाला. वृद्धी दरातील ही वाढ एक चांगले लक्षण आहे.

2} प्रती व्यक्ती उत्पन्नात वाढ :

स्वातंत्र्यपूर्वी भारताच्या दरडोई उत्पन्नात होणारी वाढ जवळपास शून्य होती. परंतु योजना काळात दरडोई उत्पन्नात 2 टक्के वाढ झाली. तिसरी योजना सोडून जवळपास सर्व योजना काळात दरडोई उत्पन्नात वाढ झाली. विभिन्न योजने अंतर्गत दरडोई उत्पन्नात होणारी वाढ खालील तालिकेत दर्शविली आहे.

तालिका -2

| योजना | प्रथम | दुसरी | तीसरी | एक वर्षीय | चौथी | पाचवी | सहावी | सातवी | आठवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वृद्धी दर {टक्केवारीत} | 1.8 | 2.1 | 0.2 | 1.4 | 1.0 | 2.7 | 3.2 | 3.6 | 4.6 |

वरील तालिकेत पहिल्या ते चौथ्या योजना काळात प्रती व्यक्ती उत्पन्नात होणारी वाढ ही कमी आहे. ही वाढ समाधानकारक नाही परंतु पाचव्या योजनेत त्यात वाढ झालेली निदर्शनास येते व सहाव्या योजने ते आठव्या योजने अंतर्गत क्रमशः 3.2 वरून 4.6 एवढी वाढ झाली. 1951-2001 या काळात स्थिर किंमती वर प्रती व्यक्ती उत्पन्न वार्शिक 2 टक्के प्रती वर्ष होती. अश्याप्रकारे नियोजित विकास त्याबाबतीचा संकेत आहे की ब्रिटिश काळातील गतीहीन अर्थव्यवस्थेची कमतरता दूर करून विकास प्रकियेचा प्रारंभ शक्य झाला आहे.

3} भांडवल निर्मितीच्या दरात वाढः

आर्थिक विकासात भांडवल निर्मिती महत्वपूर्ण असते. योजना काळात भांडवल निर्मितीच्या दरात आशादायक वाढ झाली. भांडवल निर्मितीच्या दराचे निर्धारण बचत व गुंतवणूक दरावर अवलंबून असते. प्रथम योजनेत हा दर 11.2 टक्के तर चौथ्या योजनेत बचत दरात वाढ झाली व हा दर 13.8 टक्के होता. पाचव्या योजनेच्या भांडवल निर्मिती दर 22.5 टक्के होता. सातव्या योजनेत 21.7 टक्के व आठव्या योजनेत 25.6 टक्के होता व गुंतवणूक दरात सुद्धा पहिल्या योजने पासून नव्या योजनेच्या चौथ्या वर्षी 2000-01 ला 24 टक्के होता आणि बचत दर 23.4 टक्के होता.

4} कृषी क्षेत्रात झालेली प्रगतीः

गेल्या 60 वर्षात प्रत्येक पंचवार्षिक योजनेत शेती व शेतीशी संबंधित गोष्टी व सिंचन यावर एकूण योजनेच्या खर्चाचा 23 ते 24 टक्के भाग खर्च केला हा खर्च खाजगी क्षेत्रामार्फत शेती व लघुसिंचनावर आलेल्या खर्चा व्यतिरिक्त होता. जरी अपेक्षेइतकी झाली नसली तरी शेती उत्पादनात झालेली वाढ लक्षणीय आहे. 1966 पासून कृषीच्या तांत्रिक विकासावर अधिक भर दिल्यामुळे परिणाम स्वरूप हरित क्रांती होऊ शकली. योजना काळात अन्नधान्य उत्पादनात तिप्पट वाढ झाली आणि कृषी क्षेत्रात विकास झाला. 1950-51 मध्ये अन्नधान्याचे उत्पादन 550 लाख टन झाले होते. 2000-01 मध्ये अन्नधान्याचे उत्पादन वाढून 1960 लाख टन झाले. अश्याप्रकारे कापसाचे उत्पादन 1950-51 मध्ये 50 लाख गांठ 2000-01 मध्ये हया उत्पादनात वाढ झाली. 97 लाख गांठ झाले. 1950-51 मध्ये सिंचनाची क्षमता 2 करोड 26 लाख हेक्टर होती. 2000-01 मध्ये हया क्षमतेत वाढ होऊन 9 करोड 47 लाख हेक्टर उद्देश ठरविला गेला. कृषी उत्पादन विकास दर 2.8 टक्के प्रती वर्ष होता व आता भारत अन्नधान्याची आयात करण्याऐवजी निर्यात करू लागला आहे.

5} उद्योगातील प्रगती :

योजना काळात गेल्या 60 वर्षात भारताची अर्थव्यवस्था संपूर्ण विश्वाची दहावी औद्योगिक अर्थव्यवस्था म्हणून समोर आली आहे. खनिज उद्योग रासायनिक व संबंधित उद्योगामध्ये प्रभावशाली प्रगती झाल्याचे दिसून येते. औद्योगिक क्षेत्रातील महत्वाचे यश म्हणजे भारतीय उद्योगांचे झालेले विविधिकरण होय. भारताच्या औद्योगिक क्षमतेचे विविधिकरण व विस्तार होण्यात सरकारी क्षेत्राचे योगदान महत्वाचे आहे. सर्व उपभोग्य वस्तू व पोलाद, सिमेंट हया सारख्या मूलभूत वस्तूंमध्ये देश स्वावलंबी बनत आहे. त्याचबरोबर रासायनिक खतांसारख्या इतर उद्योगांची क्षमता वेगाने वाढत आहे. भांडवली वस्तूंच्या उत्पादनातील वाढ ही लक्षणीय आहे. थोडक्यात योजना काळात भारताच्या औद्योगिक मानचित्रात महत्वपूर्ण परिवर्तन झाले आहे. प्रमुख औद्योगिक वस्तूत जसे कापड, साखर व

सिमेंटचे उत्पादन 2000–2001 मध्ये कमशः 6,967 करोड वर्ग मीटर, 187 लाख टन, 995 लाख टन झाले. पेट्रोल उत्पादन वाढून 2000–01 मध्ये 324 लाख टन झाले.

6} उपभोग्य स्तरात वाढ :

योजना काळात अनेक उपभोग्य वस्तूच्या प्रती व्यक्ती उपभोगात वाढ झाली आहे. धान्य प्रती व्यक्ती उपभोग 1951 मध्ये 334 ग्राम प्रती दिवस वाढून 2000 मध्ये 426 ग्राम पर्यंत पोहचले परंतु डाळीचे प्रती व्यक्ती उपभोग 61 ग्राम वरुन कमी होऊन 32 ग्राम वर आले. 2001 मध्ये पुन्हा धान्याचा प्रती व्यक्ती उपभोग 391 ग्राम प्रती दीन आणि डाळीचा उपभोग 26.4 ग्राम झाला. खाद्य तेल आणि वनस्पती मिळून प्रती व्यक्ती प्राप्ती 1951 मध्ये 3.1 कि.ग्राम वरुन वाढून 1999–2000 मध्ये 10.4 कि.ग्रा. झाली ही कमी होऊन 2001 मध्ये 9.4 कि.ग्राम राहीली. अश्या प्रकारे चहाची प्रती व्यक्ती उपलब्धी 1955–56 मध्ये 382 ग्राम वरुन 2000–01 मध्ये 638 ग्राम झाली. तसेच कपडा व अन्य उपभोग वस्तुच्या उपलब्धीत योजना काळात वाढ झाली. हयावरुन असे लक्षात येते की, मागील 60 वर्षात देशातील लोकांचा उपभोग स्तर व राहणीमानाच्या स्तरात वाढ झाली आहे. जीवनाच्या अन्य सुखसोयींमध्ये सुधारणा झालेली आहे. ड्राय बॅटरी सेल्स, ब्लेडस, वीजेचे दिवे, पंखे च्या उत्पादनात बरीच वाढ झाली आहे. तसेच सायकली, शिवणयंत्रे, किडा, स्कूटर्स, कार यांच्या वाढत्या प्रमाणातील वापर राहणीमाचा दर्जात वाढ झाल्याचा निदर्शक आहे.

7} रोजगाराच्या संधीत वाढ :

भारताच्या योजना काळात रोजगार संधी वाढविण्याचा सातत्याने प्रयत्न केला गेला. त्यासाठी अनेक महत्वाकांक्षी योजनाची सुरवात झाली. हया दृष्टीकोणातून रोजगार विन्मुख कार्यावर भर , कुटीर, लघु उद्योगांचा विकास विशेष योजना कार्यकम परिणाम स्वरुप रोजगाराच्या संधीत वाढ झाली.

तालिका –3

| योजना | पहिली | दुसरी | तीसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी | आठवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रोजगार संधी {लाख} | 70 | 100 | 145 | 180 | 190 | 340 | 398 | 492 |

8} सामाजिक न्याय :

छेशातील प्रत्येक नागरिकाला सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून व विषमता कमी करुन गरीब वर्गातील लोकांचा विकास करण्यासाठी गरीबी निर्मूलन कार्यकम राबविण्यात आले. ग्रामीण विकास कार्यकम, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यकम, ग्रामीण भूमीहीन रोजगार ग्यारंटी कार्यकम, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना, प्रधानमंत्री ग्रामोदय योजना, स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना इत्यादी मुख्य योजना राबविण्यात आल्या. गरीब रेषेच्या खालील लोकांना जीवनाच्या आवश्यक वस्तू योग्य किंमतीत उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक वितरण प्रणालीत सुधारणा केल्या गेल्या.

9} सामाजिक सोयींचा विस्तार :

योजना काळातील 60 वर्षात शिक्षा, स्वास्थ्य आणि घर यासारख्या सामाजिक सोयींचा विस्तार झाला आहे. सरासरी आयुर्मान वाढले तसेच मृत्यु दर कमी झाला आहे. अनेक प्रकारच्या महामारी व संकामक आजार ज्यांना पूर्वी जीवघेणारा आजर घोषित केला होता. त्यांच्यावर नियंत्रण आणल्या गेले. डॉक्टर, दवाखाने आणि ग्रामीण दवाखान्यांची संख्या वाढली आहे. शिक्षण क्षेत्रात या

योजना काळांत शिक्षण संस्थांचा विकास झाला आहे. शाळा कॉलेज व महाविद्यालय संख्या व त्यात विद्यार्थी संख्येत सुद्धा वाढ झाली आहे. तसेच योजनाकाळात दिवे, रस्ते, ग्रामीण भागातील दारिद्र रेषेखालील सर्व लोकांना घर बांधण्यासाठी गती देणे, देशातील सर्वात महत्वाच्या वस्त्या पक्क्या रस्त्यांना जोडणे प्रत्येक गावात ब्रॉडबॅंडची सुविधा उपलब्ध करणे, महिला व मुलीतील ॲनिमियाचे प्रमाण कमी करणे, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा जन स्वास्थ व सुरक्षा सेवा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कौतुकास्पद प्रयत्न केले गेले आहे.

10} विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास :

योजना काळात भारताची विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्वपूर्ण प्रगती शक्य झाली आहे. देशात जवळपास 3.5 मिलीयन तंत्रज्ञान व व्यवस्थापन प्रशिक्षण घेतलेले लोक आहेत. विश्वातील अनेक देशात भारताचे विशेषज्ञ जात आहेत. आता सध्या सूचना प्राद्योगिक क्षेत्रात भारत जगात अग्रणी देशात मोजला जातो आहे.

नियोजनाच्या यशाच्या मूल्यांकनाबाबतीत आठव्या योजनेत अश्या प्रकारे व्यक्त केल्या गेले की, समृद्धीच्या परिणाम स्वरूप अर्थव्यवस्थेत संरचनात्मक परिवर्तन झाले आहे. हे परिवर्तन उत्पादनाच्या क्षेत्रात परिवर्तन, कार्यपद्धतीत परिवर्तन, तंत्रज्ञानात प्रगती, तसेच भारत उपगुंतवणुकवादी अर्थव्यवस्थांच्या आधुनिक औद्योगिक देशाच्या रूपाने प्रगट झाला आहे.

अश्या प्रकारे निष्कर्ष रुपाने असे म्हणता येते की, योजनांनी भारताला विकास मार्गावर पुढे जाण्याच्या हेतुने अनुकूल परिस्थिती उपलब्ध केली आहे. भारताची अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात योजना काळात प्रगती झाली आहे. अर्थव्यवस्थेचा आधारभूत पाया मजबूत झाला आहे. कृषी, उद्योग, परिवहन, संचार, शिक्षा, स्वास्थ्य इत्यादी सर्व क्षेत्रात विकासाचे यश व महत्वपूर्ण प्रयत्न झाले आहे.

नियोजनाचे मूलभूत अपयश

नियोजनाचे मोठे अपयश म्हणजे हया 60 वर्षाच्या काळात पाहिजे त्याप्रमाणात नियोजनाचे फायदे समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत पोहचले नाहीत. भारतीय नियोजनाचे योग्य मूल्यांकन करण्यासाठी या काळातील अपयशाचा अभ्यास करणे सुद्धा आवश्यक आहे.

1} विकासाचा मंद दर :

भारतात विकास दर योजनेत निर्धारित उद्देश व विश्वाचा अन्य देशाच्या तुलनेत दोन्ही दृष्टीने कमी राहिली. राष्ट्रीय उत्पन्नाच्या {4.1 टक्के प्रतीवर्ष} तुलनेत प्रती व्यक्ती उत्पन्न {2 टक्के प्रतीवर्ष} वृद्धीचा दर तर आणखी कमी राहिला आज ही भारत हा देश विकसनशील देशांच्या श्रेणीतच आहे.

2} दारिद्रय दूर करण्याबाबत अपयश :

नियोजनाचे हे उपयशच आहे की, भारतात नियोजन लागू केल्यानंतरही 60 वर्षाच्या काळात अजूनही गरीबी मोठ्या प्रमाणात दिसून येते. आजही देशात जवळपास 26 टक्के लोक दारिद्ररेषेच्या खाली जीवन जगत आहेत. प्रो. लकडावाला समितीने कॅलरी उपभोगाच्या आधारे दारिद्रयात असलेल्या लोकसंख्येच्या बाबतीत काढलेल्या अनुमानानुसार 1973-74 एकूण लोकसंख्येच्या जवळपास 55 टक्के भाग दारिद्र रेषेखाली होती. त्यानंतरच्या चार दशकांत 40 टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषे खाली होती. योजना काळात दारिद्रय रेषेखाली जगणाऱ्या लोकांची संख्याा कमी होण्यापेक्षा वाढत आहे. आज जवळपास 30 करोड लोग दारिद्रय रेषेच्या खाली जीवन जगत आहेत. ही चिंतेची बाब असून योजनांच्या असफलतेचे द्योतक आहे.

3} बेरोजगारांची समस्या :

देशातील ग्रामीण व शहरी क्षेत्रातील बेरोजगार लोकांची संख्या वाढणे ही नियोजन प्रक्रियेची सर्वात मोठे अपयश आहे. तालिका क्रमांक 4 मध्ये दर्शविलेले आकडे भारतात बेरोजगारीच्या समस्येचे विकाळरूप प्रदर्शित करते.

तालिका -4
बेरोजगारीची स्थिती

| योजना | पहिली | दुसरी | तीसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी | आठवी | 2000-01 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बेरोजगारांची संख्या {लाख} | 70 | 71 | 86 | 140 | 206 | 92 | 86 | 153 | 90 |

वरील तालिकेत दर्शविलेले आकडे प्रत्येक पंचवार्षिक योजनेत बेरोजगारीची संख्या दर्शविते- पहिल्या योजनेत बेरोजगारांची संख्या 70 लाख होती. तर आठव्या योजनेत ती 153 लाख होती. याचे कारण जड उद्योगांना आवश्यकतेपेक्षा जास्त महत्व दिल्या गेले. शिक्षित व तंत्रज्ञान शिक्षण प्राप्त लोकांची बेरोजगारी वाढते आहे. ग्रामीण क्षेत्रात व समाजातील दुर्बल वर्गातील स्थिती तर अधिकच खराब आहे. दोषपूर्ण नीती व दोषपूर्ण विकास रणनीतीच्या परिणाम स्वरूप मागील काही वर्षात देशात रोजगार विहीत विकासाची परिस्थिती निर्माण झाली आहे. देशाचे उत्पादन वाढल्या नंतरही रोजगार वाढत नाही आहे.

4} किंमतीत वाढ :

भारतातील योजना किंमती स्थिर ठेवण्याच्या उद्देशाने यशस्वी झाल्या नाहीत. प्रत्येक पंचवार्षिक योजनाकाळात मूल्यवाढीचे लक्ष्याची प्राप्ती होऊ न शकल्यामुळे या काळात मूल्य वाढीचा कम निदर्शनास येतो आहे. तालिका-5 मध्ये मूल्य वाढीच्या कारणामुळे रूपयाचे मूल्य निरंतर घसरत आहे. परिणामस्वरूप देशातील गरीब जनता, मजदूर व निश्चित वेतन मिळविणाऱ्या वर्गावर महागाईचे बोझ वाढत आहे. सामान्य माणसाला आपल्या गरजा पूर्ण करणे कठीण होत आहे.

तालिका -5

| योजना | पहिली | दुसरी | तीसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी | आठवी | 2000-01 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मूल्य वाढ {टक्केवारीत} | सामान्य | 6. 25 | 5.7 | 8.9 | 6.5 | 9.3 | 6.7 | 6.6 | 4.9 |

5} असमानतेत वाढ :

योजना काळात होणाऱ्या विकासाचा लाभ समाजातील निर्धन वर्गापर्यंत पोहचू शकला नाही. ग्रामीण क्षेत्रात भूमी सुधार नीती तर जवळपास अपयशी सिद्ध झाली आहे. भूमी सुधारच्या प्रयत्न करून सुद्धा 3 टक्के कुटुंब जवळपास 50 टक्के कृषी भूमीचे मालक आहे. औद्योगिक क्षेत्रात उत्पन्न व वितरणाची समस्या सगळीकडे आहे. शहरी क्षेत्रात काळ्या धनात वृद्धी मूळे समाजातील श्रीमंत लोकांचा वायफळ खर्च वाढला आहे. देशात आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण वाढले आहे. विभिन्न वर्ग व क्षेत्रात आर्थिक असमानतेत वाढ परिणाम स्वरूप सामाजिक तणाव वाढत आहे. समाजवादी समाजाची रचना स्थापित करणारी घोषणा केवळ कागदावरच राहिली आहे.

6} उत्पादक क्षेत्रात विकासाचा मंद वेग :

कृषी व उद्योगक्षेत्रात विकासाच्या दरात पाहिजे त्याप्रमाणात वाढ झालेली नाही. कृषी क्षेत्रात तांदूळ, गहू, सोडून इतर पिकांच्या उत्पादनात समाधानकारक वाढ झालेली नाही. विशेषतः तीळ, डाळ, उत्पादनाचा दर तर खूपच मंद आहे. तसेच ग्रामीण व लघु उद्योगाचा विकास पण पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही. आज परंपरागत कारागीर संकटात आहे. औद्योगिकक्षेत्राात विकासाचा दर मंद होता. आधुनिकीकरण आणि तंत्रज्ञान प्रगतीच्या दृष्टीने भारतीय उद्योग खूपच मागासलेल्या अवस्थेत आहेत. तसेच कार्यकुशलतेचा स्तर निम्न आहे. आजारी उद्योगांची संख्या निरंतर वाढत आहे. भांडवल प्रधान उद्योगाचे प्रोत्साहन व कृषी एवं ग्रामीण उद्योगांच्या विकासाच्या अपेक्षेने कमी प्रोत्साहन प्राप्त झाले आहे.

7} सार्वजनिक क्षेत्राचे अपयश :

योजनाकाळात सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार तर झाला परंतु देशाच्या आर्थिक प्रगतीत पुरेसे योगदान प्रदान करण्यात अपयशी राहिले. खूप सारे सार्वजनिक उद्योग तोट्यात आहेत आणि त्यामुळे एकूण राष्ट्रीय संसाधनाचा विनाश झाला आहे. त्यामुळे सरकार लवकरच या क्षेत्रातील उद्योगांना कमी किंमतीत विकत आहे. त्यामुळे कर्मचारी व बेरोजगारीची समस्या निर्माण होत आहे.

8} विदेशी कर्जाचा भार :

स्वतंत्र प्राप्ती पूर्वी भारतावर बिलकूलच विदेशी कर्ज नव्हते. योजना काळात भारत मोठ्या मात्रेत विदेशी कर्जाच्या बोझ्याखाली दबत आहे. आपण जर नवीन कर्ज घेतले तर त्याचा मोठा भाग हा जुने कर्जाचा हप्ता व व्याज देण्यासाठी जातो आहे. अश्याप्रकारे भारत योजना काळात विदेशी कर्जाच्या जाळ्यात फसत आहे.

अश्याप्रकारे योजना काळात 60 वर्षात भारतात देण्याची शेष समस्या, राजकोषीय तोटा, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वाढता प्रभाव तसेच वीज, रस्ते, परिवहन, शिक्षण यावर केलेला कमी खर्च इत्यादी.

दहावी योजनेच्या दृष्टीकोण प्रपत्रात म्हटल्या गेले की बरेच काही प्राप्त केले आहे. परंतु आता हयापेक्षा अधिक करण्याची आवश्यकता आहे.

हयावरुन भारताला जगात आपले योग्य स्थान बनवायचे असेल तर आपल्या क्षमतांचा योग्य उपयोग करण्याची आवश्यकता आहे.

योजनांना यशस्वी करण्याकरिता उपाययोजना

भारतातील नियोजन काळात असलेल्या कमतरतांना दूर करून अधिक यशस्वी करणे अनेक बाबींवर अवलंबून आहे.

1.भारतातील परिस्थिती लक्षात ठेवून योग्य व व्यावहारिक रणनीती अवलंबिली गेली पाहिजे.
2.घरगुती बचत व गुंतवणूक वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.
3.अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्रात कार्यकुशलता व उत्पादकतेचा स्तर वाढविण्यावर विशेष भर दिला गेला पाहिजे.
4.प्रशासकीय पाया मजबूत करून भष्ट्राचार व अकार्यकुशलता दूर करून अधिक प्रामाणिक कार्यकुशल व जनतेप्रती अधिक संवेदनशील प्रशासकीय वर्ग निर्माण केला पाहिजे.
5.योजना तयार करणे व राबविणे यात जनतेचा सहयोग व जन सहभागिता वाएविण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजे.
6.गरीब व मागासलेल्या वर्गांच्या समस्यांचे समाधान व त्यांना लाभप्रद रोजगार देण्याची व्यावहारिक व दिर्घकालीन योजना राबविण्यात आल्या पाहिजे.
7.राज्य व केंद्र यांच्यात चांगले व परस्पर सहयोगाचे मधुर संबंधावर विशेष भर दिला पाहिजे.

8.भ्रष्ट्राचारी व काळा बाजार करणारे राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांचा शोध घेऊन त्यांना कार्य मुक्त केले पाहिजे.
9.ज्नपाल लोक बिल लागू केले पाहिजे.
10.स्माजातील प्रत्येक घटकाने जागरुकतेने लाचलुचपत, भ्रष्ट्राचार यांचा विरोध केला पाहिजे.
11.महिलांना न्याय, सन्मान पूर्वक वागणूक, स्त्री व पुरुष समानता आणण्याचे प्रयत्न स्त्री साक्षरता संबंधी, विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

भारतात नियोजनाला यशस्वी करण्याचा हेतूने बहुआयामी प्रयत्नांची आवश्यकता आहे. योजना संबंधित विभिन्न बार्बीविषयी विश्वसनीय आकडे एकत्र करणे कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे, योजना राबवितांना नियंत्रण ठेवणे, इत्यादीची समुचित व्यवस्था जर पुढील नियोजन काळात केल्या गेली तर ठरविलेले शिखर गाठण्यासाठी व विकासशील भारत देश बनण्यासाठी वेळ लागणार नाही.

संदर्भ ग्रंथ :

1.भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. सुधाकर शास्त्री, विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्यूटर्स, नागपूर तिसरी आवृत्ती, 2004.
2.भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, डॉ. जी.एन. झामरे, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर पहिली आवृत्ती, जून 2004.
3.आर्थिक नियोजन, राजीव कुमार, अर्जुन पब्लिशिंग हाऊस प्रथम आवृत्ती, 2009.
4.आर्थिक विकास एवं नियोजन, एस.पी.सिंह, एस. चन्द एण्ड कंपनी लिमिटेड रामनगर, नई दिल्ली.
5.भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. एस.सी. गुप्ता, रितु पब्लिकेशन, जयपूर, प्रथम संस्करण, 2008.
6.वैश्वीकरण एवं भारतीय अर्थव्यवस्था, सुभाष मल्होत्रा रितु पब्लिकेशन्स, जयपूर, प्रथम संस्करण, 2011.
7.भारतीय अर्थव्यवस्था, प्रा. एन.एल.चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, प्रथम आवृत्ती 2009.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net